वेणूताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड

शिविम
मराठी

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर- ४१६०११

आणि

## वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

तालुका - कराड, जिल्हा – सातारा. पिन- ४१५ १२४

या संस्थांमधील

# सामंजस्य करार

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

२० सप्टेंबर, २०२४

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

राष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑ 12AB 497349

जोडपत्र - १ व २/Annexure - I & II

मुद्रांक विक्री कारण- प्रतिज्ञापत्रकामी/बँककामी/करारपत्रकामी/टेंडरकामी

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता - VENUTAI CHAVAN COLLEGE, KARAD

SUB. TREASURY OFFICE, KARAD

02 AUG 2024

ASST. TREASURY OFFICER, KARAD

हस्ते असल्यास त्याचे नांव - विजय गोविंद माळवदे

मुद्रांक विक्री नोंदवही क्रमांक - ४८६४ दि.२७/०८/२०२४

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही - ×

श्री. शाहनवाज मुल्ला

मुद्रांक विक्रेत्याची सही

परवाना क्र.२३०३०२२/१९९७ मुद्रांक विक्रीचे ठिकाण - गुडलक झेरॉक्स, शनिवार पेठ, कराड

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर- ४१६०११

आणि

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

तालुका - कराड, जिल्हा – सातारा. पिन- ४१५ १२४

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे.

Scanned with OKEN Scanner

वेणूताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड

मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे, कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादीत ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.२३१९-६०२५ असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्तयादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे.

वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर-४१६०११ आणि वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड, जि. सातारा - ४१५१२४ या संस्था दिनांक २० सप्टेंबर, २०२४ रोजी एकमेकांबरोबर सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत

■ उद्दिष्टये

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. निबंध, वक्तृत्व, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, कथालेखन, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धांचे आयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७. दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्य विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे,

Scanned with OKEN Scanner

वेणूताई चव्हाण कॉलेज
स्थापना
१ मे १९७१
कराड

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे, ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी \ विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना, पत्रव्यवहार करणे.

१२. 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द करणे.

## ■ एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करुन विचारविनीमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

## ■ अटी आणि शर्थी

१. संघाच्या सर्व कार्यक्रमामध्ये, अधिवेशनामध्ये आणि उपक्रमामध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाने तसेच संघाच्या सभासदांनी सहभागी होणे, हजर रहाणे बंधनकारक आहे.

२. संघाचा एखादा कार्यक्रम, उपक्रम महाविद्यालयाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संघ करेल. अन्यथा आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.

Scanned with OKEN Scanner

३. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.

४. कोणत्याही महाविद्यालयांस प्रवास व भाजन भत्ता देणे बंधनकारक नाही.

५. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.

६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय आणि अंलबजावणी**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार १०० रुपयेच्या स्टॅपपेपरवर, कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून तीन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.

३. सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे, तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

स्थळ- कोल्हापूर
दिनांक- २० सप्टेंबर, २०२४

| प्रा. एस. एस.बोंगाळे<br>विभाग प्रमुख | प्रा. डॉ. एस.आर. सरोदे<br>प्रभारी प्राचार्य<br>वेणूताई चव्हाण कॉलेज,<br>कराड | प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ<br>सचिव | प्रा. डॉ. भरत जाधव<br>अध्यक्ष |
|---|---|---|---|

Scanned with OKEN Scanner